www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 08 सोमवार दि. 15 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

# नवी मुंबईचे शिल्पकार – विकासाचे शिलेदार
# जनतेचे लाडके नेते श्री. गणेश नाईक साहेब






## वाढदिवस विशेष लेख

नवी मुंबईच्या विकासाला दिशा देणारे, हजारो कुटुंबांच्या आशा–आकांक्षांना नवा आकार देणारे, जनतेच्या मनात अढळ स्थान मिळवलेले व्यक्तिमत्व म्हणजे महाराष्ट्राचे वनमंत्री श्री. गणेश नाईक साहेब. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

गणेश नाईक साहेब म्हणजे फक्त राजकारणी नाहीत, तर जनतेचे खरे सेवक आहेत. ''नवी मुंबईचे शिल्पकार'' ही ओळख त्यांना सहजासहजी मिळालेली नाही. शहराचा सर्वांगीण विकास, रस्ते–पूल, शाळा–कॉलेज, रुग्णालये, पायाभूत सुविधा यांचा दर्जेदार विस्तार – या सगळ्यामुळे नवी मुंबई आज देशभरात एक आदर्श शहर म्हणून ओळखले जाते. या घडामोडींमागे त्यांचे अथक परिश्रम आहेत. वनमंत्री झाल्यानंतर साहेबांनी ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील जनतेसाठी ''जनता दरबार'' सुरू केला. दर महिन्याला ते स्वतः जनतेच्या समस्या ऐकून त्वरित तोडगा काढतात. सामान्य माणसाला आपल्या प्रश्नासाठी दरवाजे ठोठावावे लागत नाहीत, कारण मंत्री स्वतःच जनतेच्या दारी येतात – हे लोकशाहीचे खरे रूप त्यांनी दाखवून दिले आहे.गणेश नाईक साहेब यांची खासियत म्हणजे साधेपणा, लोकांशी असलेला जिव्हाळा आणि शब्दाला जागणारा स्वभाव. त्यांना भेटणारा प्रत्येक नागरिक सांगतो – ''गणेश नाईक हे आमचे आहेत, ते आमच्यातलेच आहेत.'' हीच खरी जननेत्याची ओळख आहे.आज त्यांच्या वाढदिवशी संपूर्ण महाराष्ट्रभरातून एकच संदेश घुमतो आहे –''आपण निरोगी राहा, दीर्घायुषी व्हा आणि अशीच जनसेवा करत रहा.''नवी मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील जनतेच्या वतीनेगणेश नाईक साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**लेखक**
**अजय पांडुरंग कापरे**
**महाराष्ट्र संपादक दैनिक युवक आधार**

देशाची आर्थिक राजधानी, भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर म्हणजे मुंबई. याच मुंबई शेजारील सर्वात प्रगत आणि देशातील पहिली 'स्मार्ट सिटी' म्हणून नावारुपाला आलेले शहर म्हणजे नवी मुंबई. मुंबई वसवण्यात परकीयांचा बराच वाटा होता. मात्र, नवी मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियोजनबद्ध शहर हे भारतीय व्यक्तींच्या दूरदृष्टीतून साकारलेले आहे. नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासात आ. गणेश नाईक यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या नेतृत्वात गेली तीन दशके नवी मुंबईत विकासाची पताका फडकावली जात आहे. गणेश नाईक यांच्या कार्यातून नवी मुंबईचा चौफेर विकास साकारला आहे. गणेश नाईक यांची ओळख शून्यातून जग निर्माण करण्याची किमया साधणारे नवी मुंबईचे शिल्पकार अशी असून त्यांचे जीवनचरित्र तमाम जनतेला स्फूर्ती देणारे आहे.

गणेश नाईक यांचा जन्म दि. १५ सप्टेंबर, १९५० रोजी झाला. त्यांना लहानपणापासूनच समाजकार्याची आवड होती. इतरांच्या मदतीला धावून जाणाऱ्या आणि मनमिळावू स्वभावामुळे ते अल्पावधीत सर्वांमध्ये लोकप्रिय झाले. जिद्द, कामाची चिकाटी, प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि काम करण्याची प्रचंड ऊर्जा यामुळे त्यांनी शून्यातून गरुडझेप घेतली. बोनकोडे, कोपरखैरणे या छोट्यांशा गावातून आमदार, कार्यक्षम कॅबिनेट मंत्री, कार्यक्षम पालकमंत्री आदी पदांपर्यंतची त्यांची वाटचाल निश्चितच सर्वांना प्रेरणा देणारी आहे. मिळालेल्या प्रत्येक संधीला सुवर्णसंधी समजून त्यांनी संधीचे सोने केले. जे काही करायचे, ते उत्तम दर्जेदार आणि भव्य दिव्य करायचे ही गणेश नाईक यांची कामाची 'स्टाईल' आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ नवी मुंबईकरांच्या प्रेमाने, सहकार्याने गणेश नाईक सार्वजनिक जीवनात मोठ्या विश्वासाने कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील कोणतीही गोष्ट असो ती नंबर एकच होणार, हे नवी मुंबईकर पाहत आले आहेत. गणेश नाईक यांच्या नेतृत्वातील नवी मुंबई महानगरपालिकेने चांगल्या कामगिरीने देशातील अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळवले आहेत.

गणेश नाईक यांचे आदर्श, 'व्हिजन' घेऊन वाटचाल करणाऱ्या नवी मुंबईची ओळख 'विकसित नगरी' म्हणून देशाला आहे. नवी मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी शहराच्या परिपूर्ण विकासासाठी लोककल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवल्या आहेत. योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे नवी मुंबईला राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. आजपर्यंत दोन हजारांहून अधिक 'जनता दरबार' भरवून सामान्य नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न सोडविण्याचे काम गणेश नाईक यांनी केले आहे. हाच जनता दरबार सर्वसामान्य जनतेचा आधार ठरला आहे. माजी मंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबई पालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटांपर्यंत घरे असलेल्या रहिवाशांचा मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय घेऊन मध्यमवर्गीयांना दिलासा दिला आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात अपारंपरिक ऊर्जा विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग या दोन विभागांचा कॅबिनेट मंत्री म्हणून काम करताना गणेश नाईक यांनी या खात्यांचा कारभार गतिमान आणि गुणवत्तापूर्ण करून लोकाभिमुख केला.

गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली चांगल्या पायाभूत सोयीसुविधा नवी मुंबईत मिळाल्यामुळे शहराचे झपाट्याने नागरीकरण झाले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमातून नवी मुंबईच्या हिरवाईत भर घातली आहे. नवी मुंबई शहर महाराष्ट्राचे एक शैक्षणिक केंद्र म्हणून उदयाला आले आहे. महानगरपालिका आणि खासगी शाळांमधील गुणवत्ता वाढावी म्हणून बोर्डाच्या धर्तीवर 'एसएससी सराव परीक्षे'चे दरवर्षी आयोजन केले जाते. यात १२ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि ५० हून अधिक शाळांचा सहभाग असतो. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन दरवर्षी केले जाते. विद्यार्थ्यांना मोफत दाखले वाटप आणि करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या करिअरला गणेश नाईक यांनी साथ दिली आहे. बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी विविध कंपन्यांना एकाच मंचावर आणून त्यांनी भव्य 'रोजगार मेळाव्या'चे आयोजन केले.




नवी मुंबई हे एकविसाव्या शतकातील आधुनिक शहर म्हणून जगभरात नावाजले आहे. या लौकिकाप्रमाणेच शहरातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत, यासाठी 'मिनी ऑलिम्पिक' दर्जाचा 'नवी मुंबई क्रीडा महोत्सव' २० वर्षांपासून दरवर्षी आयोजित केला जातो. नवी मुंबईचे सांस्कृतिक वातावरण वृद्धिंगत करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**पान २ वर**

# पांडुरंग गाडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे
वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल कडा या सीबीएसई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेचे चित्रकला शिक्षक श्री.पांडुरंग गाडे गेली १३ वर्षापासून अत्यंत प्रामाणिकपणे या संस्थेत काम करत आहे .त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना बीड जिल्हा सीबीएसई सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्सचा जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला होता त्याचे वितरण शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या दिमाखात मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राध्यापिका स्नेहलताई पाठक (अध्यक्ष संस्कार भारती देवगिरी विभाग) त्याच बरोबर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अर्चना पवार ,डॉ.सुशिल लोढा, प्रा . अन्वर शेख आणि प्रा. शितल सर्वज्ञ इ . मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री अमितजी राठोड,उपाध्यक्ष- श्री. संदिपजी चानोदीया,सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष- श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे




# अविनाश थोरात यांना आदर्श गुरुवर्य सन्मान पुरस्कार



दैनिक युवक आधार
आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे
शिक्षण क्षेत्रात समर्पण, प्रामाणिकपणा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली मेहनत याची दखल घेत आंतरराष्ट्रीय लायन्स संघटना डिस्ट्रीक्ट अंतर्गत लायन्स क्लब ऑफ खेड सिटी तर्फे दरवर्षी दिला जाणारा “आदर्श गुरुवर्य सन्मान पुरस्कार” यंदा जि. प. शाळा, कुरवळ (ता. खेड) येथील कर्तव्यदक्ष शिक्षक श्री. अविनाश किसन थोरात यांना जाहीर करण्यात आला आहे.
शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करून विद्यार्थ्यांना घडविण्याबरोबरच विविध शालेय उपक्रमात, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात त्यांनी बजावलेले योगदान लक्षणीय आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत त्यांना स्पर्धात्मक वातावरणाची गोडी लावण्यात थोरात सरांचे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते.
या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी श्रीमान चंदुलाल शेठ हायस्कूल, खेड येथे करण्यात आले असून कार्यक्रमाचे वेळापत्रक दुपारी २ ते ४ असे आहे. या प्रसंगी लायन्स क्लब ऑफ खेड सिटीचे अध्यक्ष ला. महेंद्र शिरगांवकर, सचिव ला. ओम जाधव आणि खजिनदार ला. माणिक लोहार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.
या सन्मानामुळे खेड तालुक्यातील शिक्षक वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, थोरात सरांच्या यशाबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे. त्यांच्या कामगिरीमुळे संपूर्ण तालुक्याचा गौरव झाल्याची भावना व्यक्त होत आहे.
या कार्यक्रमाला शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक तसेच गावकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे माजी संचालक महादेव आमले संतोष आटोळे सोन्याबापु खाकाळ सर व इतरांनी अभिनंदन केले आहे.

# सात जोडप्यांच्या पुन्हा जुळल्या रेशीमगाठी

दैनिक युवक आधार प्रतिनिधी
रणिता ठाकूर उरण रायगड
बेलापूर विभक्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या ०७ जोडप्यांनी शनिवार दिनांक १३.०९.२०२५ रोजी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई येथे पार पडलेल्या लोकअदालतीत पुन्हा सुखाने नांदण्याचा निर्णय घेतला. सदर लोकअदालतीत कौटुंबिक न्यायालयात एकुण ९८ दावे ठेवण्यात आले होते. या दाव्यांमधील ०७ जोडप्यांनी घटस्फोटाचा मार्ग सोडून पुन्हा संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला, त्यांच्या रेशीमगाठी पुन्हा जुळल्याने त्यांचे परिवार व मुले आनंदी झाली आहेत. यावेळी न्यायाधीशांच्या हस्ते सोबत नांदायला गेलेल्या जोडप्यांना नवी मुंबई कोर्ट वकिल संघटना यांच्यातर्फे "नांदा सौख्यभरे" चे प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस.बी. अग्रवाल, बेलापूर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश-१ सी.व्ही. मराठे, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सुभाष रं. काफरे व प्राधिकरणाचे सचिव रविंद्र पाजणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत पार पडली. सध्या न्यायालयात वैवाहीक वादाचे व पोटगीसाठीचे १७७२ दावे प्रलंबित आहेत. यापैकी ९८ दावे लोक अदालतीसमोर निकाली काढण्यासाठी ठेवले होते. पी. ए. साने, जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, नवी मुंबई आणि डिंपल चांद्रा, विधीज्ञ वकिल संघटना नवी मुंबई यांनी पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले. सदर लोकन्यायालयाच्या यशस्वीतेसाठी नवी मुंबई कोर्ट वकील संघाचे अध्यक्ष सुनिल मोकल, उपाध्यक्ष संदिप रामकर, सचिव विकास म्हात्रे, खजिनदार तुषार राऊत, सहसचिव संजय म्हात्रे व हेमांगी पाटील आणि कार्यकारिणी सदस्य समीत राऊत, दत्तात्रय जगताप, अजिंक्य गव्हाणे, निलेश पाटील आणि डिंपल चांद्रा यांनी सहकार्य केले. तसेच कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक गणेश हिरवे, विवाह समुपदेशक भारत काळे, लघुलेखक विजय पोटे, सहा अधिक्षक राजेश म्हात्रे, वरिष्ठ लिपीक कांचन किर्वे, कनिष्ठ लिपीक श्रेया म्हात्रे, अक्षता कोळसुंदकर आणि सहाय्यक प्रिती नन्नावरे व राज निकम यांनी यशस्विरित्या सहकार्य केले.






# तहसीलदार वैशाली पाटील यांच्या कारवाईमुळे वाहीरा ते पिंपळगाव दाणी रस्ता झाला मोकळा



दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे
आष्टी तालुक्यातील वाहीरा ते पिंपळगाव दाणी हा दहा वर्षे रखडलेला रस्ता शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी सुरळीत झाला आहे.तहसीलदार वैशाली पाटील यांच्या धाडसी आणि कार्यक्षम हस्तक्षेपामुळे हे शक्य झाले. गेल्या दहा वर्षांपासून हा रस्ता बंद पडल्यामुळे वाहीरा गावचे शेतकरी, वाडीवस्तीतील ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील लोक येणे-जाणे करताना भारी त्रास सहन करत होते. या समस्येचे निराकरण व्हावे यासाठी वाहीरा गावचे सरपंच संभाजी गाडे आणि माजी उपसरपंच नवनाथ आटोळे यांनी तहसीलदार वैशाली पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.तहसीलदार पाटील यांनी या प्रकरणी तातडीने कार्यवाही करून सुनावणी घेतली आणि प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. रस्त्यावर झालेली अतिक्रमणे हटवण्यासाठी ग्रामपंचायतीला आदेश दिले. नायब तहसीलदार मोहिते,नायब तहसीलदार भगीरथ धारक, ग्राम महसूल अधिकारी योगेश गोरे, मंडळ अधिकारी पखाले, तलाठी पाठक आणि महसूल सेवक शरद मेटे या सर्व अधिकाऱ्यांच्या कुशल सहकार्यातून हा रस्ता रहदारीसाठी पूर्णतः मोकळा करण्यात आला.
या कार्यवाहीमुळे ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांची दहा वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे.आता त्यांना शेतात जाण्यासाठी, बाजारासाठी इतर गावी जाण्यासाठी सोयीस्कर रस्ता उपलब्ध झाला आहे.रस्ता मोकळा झाल्यामुळे आनंदीत झालेल्या ग्रामस्थांनी तहसीलदार वैशाली पाटील आणि इतर अधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले."असे जनहितवादी अधिकारी समाजासाठी काळाची गरज आहे,"असे ग्रामस्थांनी बोलताना सांगितले.

# नवी मुंबईचे शिल्पकार – विकासाचे शिलेदार जनतेचे लाडके नेते श्री. गणेश नाईक साहेब

पान १ वरुन

नवी मुंबईचे शिल्पकार गणेश नाईक यांनी आपल्या नेतृत्वाखाली सर्वोत्तम पायाभूत सोयी-सुविधा देऊन नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवले आहे. त्यातील काही ठळक कामे म्हणजे, पुढील ५० वर्षांचा विचार करून नवी मुंबईला अत्यावश्यक पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी मोरबे धरण घेतले. मुंबईच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील धरणानंतर स्वतःच्या मालकीचे धरण असणारी नवी मुंबई राज्यातील एकमेव महानगरपालिका ठरली आहे. आशिया खंडातील पहिल्या हरित महानगरपालिका भवनची निर्मिती, नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या आवारात २२५ फूट उंचीच्या आणि २४ तास सदैव फडकणाऱ्या राष्ट्रध्वजाची नोंद ‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये करण्यात आली आहे. नवी मुंबईचे ‘लॅण्ड मार्क’ म्हणून ओळख ठरलेल्या ‘वंडर्स पार्क’ची निर्मिती केली. नवी मुंबईमध्ये २०० हून अधिक उद्याने असून ‘उद्यानांचे शहर’ म्हणून ओळख निर्माण झाली.

सांडपाण्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करणारी ‘सी-टेक’ ही अत्याधुनिक तंत्र राबवणारी अग्रगण्य महानगरपालिका म्हणून नवी मुंबई महानगरपालिका ओळखली जाते. त्यासाठी सहा मलनिस्सारण व्यवस्थापन केंद्रे उभारली आहेत. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, महाराष्ट्र शासनाने सुरू केल्यावर राज्यातील सर्वात स्वच्छ शहराचा बहुमान नवी मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झाला. घनकचरा व्यवस्थापन उत्तम दर्जाचे केले जाते. अत्याधुनिक पद्धतीने नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवल्या जातात. रस्ते हा शहराचा आरसा समजून शहरातील मुख्य रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण केले. नवी मुंबईचा ‘क्वीन्स नेकलेस’ अशी ओळख असणाऱ्या ‘पाम बीच मार्गा’वर सौंदर्यात भर घातली. सीबीडी बेलापूर येथील सेक्टर १५ मध्ये आकर्षक रस्ते साकारले आहेत. बेलापूर येथे ‘कम्युनिटी सेंटर’ उभारले. महापे जंक्शन एलिव्हेटेड मार्ग पूर्ण केला आहे. ‘बेलापूर सी शोअर’, ‘एसटीपी केंद्र’, शहरात प्रशस्त मैदाने साकारली आहेत. एनएमएमटीमध्ये ‘व्होल्वो बस’, ‘ब्रांटो स्कायलिफ्ट कार’, ‘एपीएमसी केंद्र’, ‘डम्पिंग ग्राऊंड’, ‘सीसीटीव्ही’ कॅमेरे, प्रशस्त ठाणे-बेलापूर मार्ग, शहर सुरक्षेच्या दृष्टीने तत्पर आणि कार्यक्षम अग्निशमन दल आदी कामे करुन नवी मुंबईकरांचे जीवनमान उंचावले आहे.



गणेश नाईक यांचे नवी मुंबईसाठी भविष्यकालीन ‘व्हिजन’ म्हणजे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते रुंदीकरण, बगीच्यांचा विकास, ‘मल्टिलेव्हल पार्किंग’, ‘आयकॉनिक’ प्रवेशद्वारे, बस आगारांचा विकास, वाहतूक व्यवस्थापन, ‘डिजिटल सिटी इन्फॉर्मेशन’, सार्वजनिक ठिकाणांचे व्यवस्थापन, पर्यावरणपूरक शहरांची निर्मिती, मनोरंजनाच्या सोयी, पर्यटन स्थळे आणि क्रीडा सुविधांचा विकास, शाळांची पुनर्बांधणी, घाऊक बाजारांचे आधुनिकीकरण, महामार्गाचा विकास आणि मोरबे धरण परिसरातील ‘सोलर पार्क’ असा नवी मुंबईच्या एकत्रित नियोजन आणि विकासाचा पारदर्शी प्रकल्प आहे. आज त्यांना वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा...

नाईक साहेबांचे योगदान अतुलनीय आदरणीय गणेश नाईक साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..! नाईक साहेबांच्या रुपाने ठाणे जिल्ह्याला एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभले आहे, जी खऱ्या अर्थाने जिल्ह्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. निश्चितपणे मागील अनेक वर्षांपासून ठाणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान हे अतुलनीय आणि अविस्मरणीय आहे. नवी मुंबई शहराच्या जडणघडणीमध्ये त्यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. जरी मी आज केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये केंद्रीय मंत्री म्हणून कार्यरत असलो, तरी गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यासोबत मला काम करता आले. मी स्वतःला भाग्यशाली समजतो की, त्यांच्या नेतृत्वाखाली मी काम केले. बऱ्याच गोष्टींमध्ये काम करण्यासाठी मला त्यांच्याकडूनच प्रेरणा मिळाली. येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या हातून महाराष्ट्राची सेवा घडावी, यासाठी त्यांना मी शुभेच्छा देतो...!

१९७०-८० पर्यंत मुंबई हीच खऱ्या अर्थाने औद्योगिक नगरी होती. त्यानंतरच्या काळात ठाणे आणि नवी मुंबईत उद्योगांचा विस्तार झाला. या उद्योग विस्ताराने नवी मुंबईकरांना, विशेषतः कोळी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली, पण त्याबरोबरच नवी मुंबईतल्या खैरणे-बोनकोडे गावात जन्मलेल्या गणेश नाईक यांच्या रूपाने एक उमदे नेतृत्वही महाराष्ट्राला मिळाले. ‘रिलायन्स’ कंपनीत कामगार नेता म्हणून सार्वजनिक कामाला सुरुवात केलेल्या मा. गणेश नाईक यांच्या भोवती आजपर्यंत ठाणे जिल्ह्याचे समाजकारण आणि राजकारण फिरत राहिले. मा. गणेश नाईक यांना स्थानिकांच्या प्रश्नांची चांगली जाण आहे, निष्ठावान लाखो कार्यकर्त्यांचा संच त्यांनी बांधला आहे, विकासाची दृष्टी, प्रशासनाकडून विकास कामे करून घेण्याचे कौशल्य आणि आक्रमक शैली ही त्यांची बलस्थाने आहेत. कायम लोकांमध्ये रमणारे आणि आपलेसे वाटणारे त्यांचे व्यक्तिमत्व असल्यामुळेच गेली ४१ वर्षे नाईक साहेब महाराष्ट्राच्या राजकारणात आपला वेगळा ठसा निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्राबरोबरच प्रशासकीय आणि संसदीय कामाचा गाढा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. विधानसभा सदस्य, कामगार, पर्यावरण, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप पाडली आहे. मा. गणेश नाईक यांचे मी वाढदिवसाप्रीत्यर्थ अभीष्टचिंतन करतो आणि भविष्यातील सामाजिक आणि राजकीय कार्यासाठी त्यांना बळ प्राप्त होवो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

## पॅन कार्ड क्लब मार्केटिंग प्रतिनिधी आणि गुंतवणूकदार आझाद मैदानावर काढणार मोर्चा, पनवेल येथे संघर्ष मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

देवा भाऊ तुम्हीच आमची दिल्ली, असे म्हणत पॅन कार्ड क्लब मार्केटिंग आणि प्रतिनिधी व गुंतवणूकदार आझाद मैदानात मोर्चा काढणार असल्याचे श्रमिक मुक्ती दलचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. भारत पाटणकर यांनी संघर्ष मेळाव्यात सांगितले. पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या हॉलमध्ये १४ सप्टेंबर रोजी आयोजित पॅनकार्ड क्लब धारकांचा लढा अखेरचा या संघर्ष मेळाव्यात ते बोलत होते.

पॅन कार्ड क्लबमुळे अनेक मार्केटिंग, प्रतिनिधी, गुंतवणूकदार हवालदिल झालेले आहेत. अनेकांची जमापुंजी यात अडकली आहे. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पनवेल येथे जेष्ठ समाजसेवक डॉ. भारत पाटणकर यांच्या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आझाद मैदानात उपोषणकर्त्यांची मर्यादा असेल तर त्या ठिकाणी आणि सर्व जिल्ह्यात बसून शांततेत आंदोलन करावे लागेल असे पाटणकर यांनी सांगितले. एकीचे बळ असेल तर अशक्य गोष्टी देखील शक्य होतात. गुंतवणुकीला आजचा दर मिळून भरपाई मिळावी आणि चालू कंपनी मधून लाभार्थ्यांना लाभाचा परतावा चालू करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. पॅन कार्ड क्लबचे हॉटेल्स काही ठिकाणी चालू आहेत ते आपल्याच पैशातून चालू असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे या क्लबचे व्यवस्थापक आणि जे मालक चालवतात त्यांना बाहेर काढलं पाहिजे असे यावेळी सांगण्यात आले. महागाईमुळे पैशाचे महत्व कमी झाला आहे म्हणून भरपाई मागताना आजच्या मूल्यांकनाप्रमाणे बधितांना न्याय मिळाला पाहिजे. आपल्याला परतावा मिळवून देण्यासाठी हा संघर्ष पुकारला असून या लढ्यामध्ये आपण सर्वांनी सामील झाले पाहिजे. लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून शासनाला आपण जाब विचारला पाहिजे असे सांगत मुख्यमंत्री, अर्थमंत्री, पंतप्रधान यांची देखील भेट घेणार असल्याचे पाटणकर यांनी सांगितले. यावेळी सर्वांनी एकमताने पाटणकर यांच्या विचारांना सकारात्मक प्रतिसाद देत अंतिम विजयापर्यंत एक संघ राहण्याची ग्वाही दिली.




दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पनवेल महानगरपालिकेत 47 दैनंदिन बाजार विकसनासाठी निविदा पूर्ण

## मनसेची परप्रांतीय फेरीवाल्यांच्या परवान्याबाबत पुनरतपासणीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेने शहरात ४७ दैनंदिन बाजार विकसित करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ५० कोटी ७० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये चार प्रभागांमध्ये बाजारांचा विकास होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) ४७० परप्रांतीय फेरीवाल्यांना दिलेल्या अधिकृत पथविक्रेता परवान्यांबाबत शंका उपस्थित करत त्यांच्या डोमिसाईल प्रमाणपत्रांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मनसेचे पनवेल महानगरपालिकेचे उपाध्यक्ष दिपक कोळवणकर यांनी याबाबत प्रशासनाला निवेदन देण्याची घोषणा केली आहे.

**प्रकल्पाची विभागवार माहिती:**
प्रभाग अ (खारघर): १५ बाजार, खर्च: १२ कोटी ४८ लाख रुपये. प्रभाग ब (कळंबोली): १४ बाजार, खर्च: १२ कोटी ४८ लाख रुपये. प्रभाग क (कामोठे): ५ बाजार, खर्च: ७ कोटी ९ लाख रुपये. प्रभाग ड (पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी): १४ बाजार, खर्च: १० कोटी २० लाख रुपये. एकूण खर्च: ४५ कोटी ३३ लाख रुपये (विभागीय वितरणानुसार). फेरीवाल्यांबाबत तपशील:एकूण अधिकृत फेरीवाले: ३१५४.

**परप्रांतीय फेरीवाले:**
४७० (मुख्यतः झारखंड, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल). मनसेची मागणी: मनसेने परप्रांतीय फेरीवाल्यांना दिलेल्या परवान्यांवर शंका उपस्थित केली आहे. त्यांचे डोमिसाईल प्रमाणपत्र तपासले आहे का, याची चौकशी करावी, अशी मागणी आहे. मनसेच्या मते, केवळ पनवेलमध्ये कायमस्वरूपी वास्तव्य असलेल्या स्थानिक फेरीवाल्यांची पूर्ण तपासणी करूनच त्यांना परवाना द्यावा. अन्यथा, परप्रांतीय आणि स्थानिक फेरीवाल्यांमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता आहे, असे मनसेने नमूद केले आहे.

**मनसेची भूमिका** :
मनसेने स्थानिक फेरीवाल्यांना प्राधान्य देण्याचा आग्रह धरला आहे. परप्रांतीय फेरीवाल्यांच्या परवान्यांची काटेकोर तपासणी न केल्यास स्थानिक विरुद्ध परप्रांतीय असा तणाव निर्माण होऊ शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे. यामुळे प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे.टीप: बातमीतील एकूण खर्च (५०.७ कोटी) आणि विभागीय खर्च (४५.३३ कोटी) यातील तफावत स्पष्ट नाही. याबाबत अधिक माहिती मिळाल्यास ती समाविष्ट केली जाईल.

# उलवे येथे दुर्मीळ 42 मुनिया पक्षी जप्त – तस्करांना कोठडी !

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र/प्रतिनिधी

उरण वनविभागाने उलवे नोड परिसरात मोठी धाड टाकत दुर्मीळ पक्ष्यांच्या तस्करीचा पर्दाफाश केला. रेड मुनिया, स्कॅली मुनिया आणि ट्रायकलर मुनिया या मौल्यवान प्रजातींचे तब्बल 42पक्षी जप्त करण्यात आले. या प्रकरणी देवेंद्र लालचंद पाटील (रा. कोपरखैरणे) आणि हरेश दामोदर पाटील (रा. पेण) या दोन तस्करांना अटक करून पनवेल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांनाही दोन दिवसांची कोठडी सुनावली. गोपनीय माहितीच्या आधारे उरणचे वनपरीक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे, वनपाल संजय पाटील (दापोली), नारायण माने (जासई), तसेच वनरक्षक पांडुळे, खताळे, झेंडे, कार्ले, पाटील आणि रेंज स्टाफ यांच्या संयुक्त पथकाने ही धाड घातली. रात्री सुमारे नऊ वाजता आरोपी हे पक्षी विक्रीसाठी पिंजऱ्यात घेऊन आले असताना सापळा रचून कारवाई करण्यात आली.जप्त केलेले सर्व पक्षी वनविभागाने नंतर जंगलात सोडले. आरोपींवर वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम 9,39,48 (अ) व 51 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनविभागाचे हे पथक कार्यवाहीसाठी कौतुकास



पात्र ठरले असले, तरी उलवे व आसपासच्या भागात दुर्मीळ पक्ष्यांची अशी उघड तस्करी नेमकी कोणाच्या आश्रयामुळे फोफावत आहे? हा प्रश्न अनुत्तरितच आहे. प्रशासनाच्या नजरेआड होऊन पर्यावरणाशी खेळ करणारे हे माफिया आता उघड झाले आहेत.

# कामोठे टीचर्स असोसिएशन व निसर्ग प्रेमीसंस्था कामोठे यांच्या माध्यमातून एक पेड माँ के नाम वृक्षारोपण संपन्न




दैनिक युवक आधार अण्णासाहेब आहिरे
पर्यावरण संवर्धन व मातृसन्मान या दोन्ही मूल्यांचा संगम साधणारा उपक्रम "एक पेड माँ के नाम" कामोठे टीचर्स असोसिएशन व निसर्ग प्रेमीसंस्था यांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविण्यात असून पटेल प्लाझा,मानसरोवर स्टेशन रोड,सेक्टर १७ कामोठे येथे हा वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला
या उपक्रमात शिक्षकांनी आपल्या मातोश्रींच्या नावाने झाडे लावत मातृप्रेम व्यक्त केले तसेच समाजाला पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला,या ठिकाणी विविध वृक्षप्रजाती लावण्यात आल्या आहेत,
निसर्गप्रेमी संस्था कामोठे चे अध्यक्ष सुनील कर्पे यांनी सिमेंटचे जंगल वाढत असून त्यामुळे पर्यवारणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण गरजेचे आहे व त्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले

कार्यक्रमास कामोठे टीचर्स असोसिएशनचे शिक्षकवर्ग , निसर्गप्रेमी.. संस्थेचे पदाधिकारी व नागरिक सुनिल कर्पे सर अध्यक्ष निसर्ग प्रेमी संस्था कामोठे,सुरेश खरात समाजसेवक व सौ.शुभांगी खरात समाजसेवका पंकज पाटील सर,शितलकुमार शिंदे सर,अमोल शितोळे समाजसेवक,सहाणे गोरक्ष सर,संजय जाधव सर,सुगत भगत सर,दादू निकाळजे साहेब,उमेश गायकवाड साहेब,अथर्व धोंडे,दत्ता जोगदंड साहेब,शशिकांत शिंदे सर,थोरात तुकाराम सर,दहिफळे साईनाथ सर,कु.तन्मय कणसे,सुवर्णा कणसे मॅडम यांनी वृक्षारोपणात सहभाग घेत सामाजिक उपक्रमाला पाठबळ दिले.

नमुना एन डी

( नियम ९२(३) पहा )

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/4891 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AZ8695 चे मालक कै विजय गामा भारद्वाज याचं दिनांक 01/05/2025 रोजी निधन झाले आहे.

**मी रिता विजय भारद्वाज.**
**मारुती निवास, विमलवाडी,**
**सुकापूर पनवेल,रायगड, महाराष्ट्र - 410206.**

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.
उत्तरआधिकारचे नाव–

**रिता विजय भारद्वाज.**
**मारुती निवास विमलवाडी सुकापूर,**
**पनवेल, रायगड,महाराष्ट्र,410206.**

# नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान : लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी


प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 17 सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी2 ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत. या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.

जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरे

राज्यातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील. या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

तळागाळातील नागरिकांसाठी मोठा दिलासा

नेत्ररोग उपचाराचा खर्च गरीब नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग या उपक्रमातून खुला होणार आहे. या उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे. यामुळे लाखो रूग्णांवर मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेसह औषधोपचार केले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ राज्यातील गरजू रूग्णांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.



# पोकसो ऍक्ट विषयक कायदेविषयक जनजागृती




**दैनिक युवक आधार नवीन पनवेल वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या वतीने अमिटी युनिव्हर्सिटी येथे पोकसो ऍक्ट विषयक कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

उमा बोराडे, न्यायाधीश, पनवेल यांनी न्याय हा प्रत्येक घटकाचा जन्मसिद्ध हक्क असल्याचे सांगितले आणि केवळ आर्थिक दुर्बलतेमुळे कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, असे अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात महत्त्वाकांक्षी होण्यासाठी प्रोत्साहित केले. एम. वाय. राणे, न्यायाधीश, पनवेल यांनी कायद्याकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले व कायदेशीर जाण व्यक्तिमत्त्व घडविणारी असल्याचे सांगितले. व आत्मविश्वासाने येणाऱ्या काळात उत्तुंग भरारी घेण्यास विद्यार्थ्यांना स्व अनुभवातून प्रेरणा देण्याचे काम केलं.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात अड. दिपाली बोहरा यांनी पोकसो ऍक्ट मधील महत्त्वपूर्ण तरतुदींबाबत मार्गदर्शन केले, तर अड. इंद्रजीत भोसले यांनी या कायद्याचे विविध पैलू सखोल विवेचनातून मांडले. समारोप करत पी. एल. व्ही. शैलेश कोंडसकर यांनी अमेठी युनिव्हर्सिटीच्या सर्व आयोजकांचे आभार मानले व विद्यार्थ्यांना या अश्या उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे आवाहन केले. अड. स्वाती सोनवणे, अड. सुयश कामेरकर, अड. मनीषा गावंडे तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांची उपस्थिती लाभली. या सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढवून न्यायप्राप्ती प्रक्रियेवर विश्वास दृढ केला.

जाहीर प्रगटन

सर्वत्र जनता ग्रामपंचायत कार्यालय शाख १४ ता. जाफ्राबाद जि. जालना यांना या जाहीर प्रगटनाव्दारे जाहीर करण्यात येतो की, अर्जदार स्वतः नागे श्री/श्रीमती/कुमार/कुमारीः– पंडित जनार्धन दामधर रा.भारज बु ता. जाफ्राबाद यांचा / हिचा जन्म / मृत्यू दि. १५/०७/१९८० रोजी मौजे, भारज व ता.जाफ्राबाद येथे झालेला / झालेली आहे. तसेच वरील येथील रहीवाशी असून याचे जन्म/मृत्यूची ग्रामपंचागत कार्यालय, भारत भयेथे नोंद केलीली नसल्यामुळे अर्जदार यांनी या कार्यालयात जन्म–मृत्यू नोंद घेणे बाबत विनंती अर्ज सादर केले आहे. सदरील जन्म/मृत्यू नोंदी बाबत कोणास काही आक्षेप असल्यास हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाने आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दाखल करावेत. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही. असे गृहीत धरून प्रकरणांत पूढील कार्यवाही येईल यांची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जाफ्राबाद.**

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

१. पोलीस निरीक्षक / सहा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, जाफ्राबाद/टेभूर्णी यांना जाहीर प्रकटनाच्या दोन प्रती देवून सुचीत करण्यात येते की, अर्जदार संबधीत गावाचे रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबाबत जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा..

ता. जाफ्राबाद २. ग्रामपंचायत कार्यालय, नगरपंचायत, जाफ्राबाद ग्राम महसूल अधिकारी भारज वू यांना जाहीर प्रकटनाच्या दोनप्रती देवून सुचीत करण्यात येते की, जाहीर प्रकटनाची प्रसिध्दी गावात करुन प्रसिध्दी तसेच संबधीत गावाचे रहिवाशीआहेत किंवा नाहीत व जन्म/मृत्यू विषयी सर्व पुराव्याची चौकशी करून या कार्यालयास विना विलंब अहवाल सादर करावा.

**तहसील कार्यालय जाफ्राबाद.**

# पनवेलमध्ये खड्ड्यांची 'सफारी'!

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अनोख्या आंदोलनात साक्षात यमराजही सामील; प्रशासनावर सडकून टीका

दैनिक युवक आधार
पनवेल, प्रतिनिधी

: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खड्ड्यांच्या विरुद्ध एक अनोखे आणि खणखणीत आंदोलन करण्यात आले. 'खड्डे सफारी' या नावाने साजरे झालेल्या या आंदोलनात साक्षात यमराजही सामील झाले होते! मनसे राज्य प्रवक्ते व पनवेल महानगर अध्यक्ष श्री. योगेश चिले यांच्या नेतृत्वाखाली तमाम महाराष्ट्र सैनिकांनी पनवेल शहरातील 'ऐतिहासिक' खड्ड्यांची जनतेला सफर करून दाखवली. या आंदोलनाद्वारे ठेकेदार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या मिलीभगत असलेल्या भ्रष्टाचारावर मनसेने कठोर शब्दांत टीका केली असून, प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.पनवेल शहरात शेकडो कोटी रुपयांचा खर्च करूनही रस्ते बुजवण्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप मनसेने केला आहे. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने खड्डे बुजवण्याऐवजी ते पुन्हा उघडून लोकांना त्रास देण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले जाते. यामुळे पनवेलवासीयांना दररोज शारीरिक त्रास होत असून, त्यांच्या वाहनांचे आर्थिक नुकसान होत आहे. मात्र, महानगरपालिका प्रशासनाला याची काहीही पर्वा नसल्याचा आरोप करत मनसेने प्रशासनाला सदैव झोपेत असल्याचे म्हटले आहे. "खड्ड्यांमुळे पनवेल हे 'खड्ड्यांचे शहर' बनले असून, लोकांना रस्त्यावरून न चालता खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत आहे," अशी खोचक टीका श्री. चिले यांनी केली.

आंदोलनादरम्यान, मनसे कार्यकर्त्यांनी शहरातील प्रमुख ठिकाणी असलेल्या खड्ड्यांची 'सफारी' आयोजित केली. यात साक्षात यमराजाची प्रतिमा घेऊन खड्ड्यांमध्ये 'मृत्यूचे स्वागत' करण्याचा प्रतीकात्मक उपक्रम करण्यात आला. यमराजाच्या हातात 'ट्रिपॉड' आणि 'काठी' घेऊन खड्ड्यांमध्ये 'प्रवेश' करताना कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. "खड्ड्यांमुळे लोकांचा जीव धोक्यात आहे, प्रशासन जागे व्हा! ठेकेदारांची लूट थांबवा!" अशा घोषणा देत आंदोलकांनी प्रशासनावर हल्लाबोल केला. या आंदोलनाने पनवेलवासीमध्ये उत्साह निर्माण झाला असून, अनेकांनी मनसेला पाठिंबा दिला. श्री. योगेश चिले म्हणाले, "पनवेल महानगरपालिकेच्या बजेटमधील शेकडो कोटी रुपये रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी खर्च होत असतानाही खड्डे वाढतच चालले आहेत. ठेकेदार निकृष्ट माल वापरून काम करतात आणि अधिकाऱ्यांची डोळ्यात तेल घालून पाहणी करतात. यामुळे सामान्य नागरिकांना वाहनांचे नुकसान होत असून, आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे. मनसे हे सहन करणार नाही. जर प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही, तर आणखी मोठे आंदोलन उभे राहील." ते पुढे म्हणाले, "या 'खड्डे सफारी'मुळे प्रशासनाला जाग येईल आणि पनवेलवासींना न्याय मिळेल." महानगरपालिका प्रशासनाने अद्याप यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, हे आंदोलन पनवेलमधील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी नवीन वळण देऊ शकते. मनसेने या आंदोलनाची व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत जनजागृती केली असून, पनवेलवासींनीही याला भरभरून प्रतिसाद दिला आहे. पनवेल शहरातील हा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी मनसे आणखी उपक्रम राबवणार असल्याचे श्री. चिले यांनी सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# संकल्प नाईक : नव्या पिढीचे उमदे नेतृत्व



नवी मुंबई म्हटली की प्रत्येकाच्या मनात एकच नाव डोकावते – नाईक परिवार. चार दशकांहून अधिक काळ या कुटुंबाने शहरातील जनतेची सेवा केली आहे. प्रत्येक नागरिकाच्या अडीअडचणींमध्ये धावून जाणे, समस्या सोडवणे आणि समाजकारणाचा नवा आदर्श घालून देणे ही परंपरा आजही तितक्याच ताकदीने सुरू आहे. या परंपरेचा नवा चेहरा म्हणून पुढे येत आहे संकल्प संजीव नाईक. संकल्प हे महाराष्ट्राचे लोकप्रिय वनमंत्री गणेश नाईक यांचे नातू आणि माजी खासदार संजीव नाईक यांचे सुपुत्र आहेत. लंडनमध्ये शिक्षण घेतलेला हा नव्या दमाचा तरुण आज आपल्या आजोबांसोबत राहून राजकारण, समाजकारण आणि प्रशासन कसे चालवावे याचे धडे घेत आहे. गणेश नाईक यांच्यासारख्या अनुभवी नेत्याची साथ आणि आशीर्वाद लाभलेला संकल्प आज नवी मुंबईत नव्या युगातील तरुण वर्गाचा प्रेरणादायी चेहरा बनत आहे. तरुणाईला काय हवे, भारताला कोणत्या नव्या संकल्पनांची गरज आहे, हे या उमद्या तरुणाला माहीत आहे. तो स्वतः तरुण असल्यामुळे त्याचा दांडगा जनसंपर्क आहे. संकल्प आपल्या वडिलांच्या कार्यकर्त्यांना, काका संदीप नाईक यांच्या सहकाऱ्यांना आणि आजोबांच्या समर्थकांना तितक्याच आत्मीयतेने



आपलेसे करतो. त्यामुळे नाईक परिवाराची सामाजिक आणि राजकीय घडी अधिक भक्कम होत आहे. आज महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे तरुणांना नेतृत्व करण्याची संधी देतात. त्यांच्या आवडीच्या तरुण चेहऱ्यांमध्ये संकल्प नाईक हे नाव ठळकपणे घेतले जाते. या विश्वासाला पात्र राहून संकल्प नवी मुंबईत नव्या नेतृत्वाचा आश्वासक चेहरा म्हणून उदयास येत आहेत. गणेश नाईक यांचे जनसंपर्क, समाजकारणातील अनुभव आणि राजकारणावरील पकड, त्यासोबत संकल्पची तरुणाईतील लोकप्रियता – या दोन पिढ्यांची केमिस्ट्री निश्चितच नवी



मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्राला विकासाच्या एका नव्या टप्प्यावर घेऊन जाणार आहे. आजोबा आणि नातवाची ही जोडी फक्त नवी मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरही नवा अध्याय लिहिण्यास सज्ज आहे. समाजसेवेची परंपरा, कार्यकर्त्यांचे जाळे आणि आधुनिक शिक्षणाचा दृष्टिकोन – या सर्वांचा संगम म्हणजे संकल्प नाईक. त्यामुळे नवी मुंबईच्या जनतेला विश्वास वाटतो की त्यांच्या पुढील पिढीचे भविष्य सक्षम, सुरक्षित आणि प्रगत हातात आहे.

**लेखक**
***अजय पांडुरंग कापरे***
**महाराष्ट्र संपादक दैनिक युवक आधार**

# उरण तालुकास्तरीय पावसाळी मैदानी क्रीडा स्पर्धा भागूबाई ठाकूर विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी

गुरुवार दि.११सप्टेंबर ते१२ सप्टेंबर २०२५ रोजी उरण तालुक्यातील पावसाळी मैदानी क्रीडा स्पर्धा मान.सौ. निर्मला घरत मॅडम गटशिक्षणाधिकारी पं.स.उरण व भागूबाई विद्यालय द्रोणागिरीचे चेअरमन मा. चंद्रकांत घरत सर,राहुल घरत,मुख्याध्यापिका अनुराधा काठे मॅडम,क्रीडा प्रमुख हरिश्चंद्र भोंडकर सर,तालुक्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळेतील पंच तसेच मार्गदर्शक शिक्षक बंधू भगिनी सह सर्व सहभागी खेळाडू च्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी १४,१७व १९ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी ३००० मी, १५०० मी, ८०० मी, ४०० मी ,२०० मी, १०० मी धावणे, ४×१००,४×४०० रिले, ३०००मी चालणे, ८०,१०० मी हर्डल,गोळा फेक ,थाळी फेक, भालाफेक या स्पर्धेत अनेक शाळांनी उत्तम सहभाग घेवून स्पर्धेत आपली चमक दाखवली. श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालय द्रोणागिरी येथे मुलांमुलींच्या तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा व्यवस्थित रित्या संपन्न झाल्या.

उपस्थित सर्व शिक्षकांच्या नाश्त्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था केल्याबद्दल शालेय प्रशासन व मुख्याध्यापिका काठे मॅडम आणि तेथील शिक्षक वृंद,कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच ज्यांच्यामुळे सर्व स्पर्धा व्यवस्थितरित्या संपन्न झाल्या त्या सर्व पंच शिक्षकांना मनःपूर्वक धन्यवाद देवून स्पर्धेची सांगता करण्यात आली.









# पुणे युनिट 3 गुन्हे शाखा, पुणे पोलिसांची कौशल्य पूर्ण कामगिरी

## खुनाच्या प्रयत्नातील रेकॉर्डवरील इसमाला लोखंडी कोयत्यासह केली अटक

**दैनिक युवक आधार**
**पुणे जिल्हा प्रतिनिधी संतोष लांडे**

**पुणे** : दिनांक १२सप्टेंबर २०२५ शुक्रवार रोजी गुन्हे शाखा युनिट ३ चे सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर ढवळे, पोलीस उप-निरीक्षक पंढरीनाथ शिंदे व पोलीस अंमलदार असे वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्ह्यात पाहिजे असलेले आरोपी व रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करुन कारवाई करण्यासाठी हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पोलीस अंमलदार पंढरीनाथ शिंदे, अमोल काटकर व तुषार किंद्रे यांना त्यांच्या गोपनिय बातमीव्दारे मिळालेल्या माहितीवरुन इसम नाव महेश पांडुरंग भगत वय ३२ वर्षे रा. रामनगर मनपा शाळेजवळ वारजे पुणे यास त्याच्या ताब्यात १ लोखंडी पालगन (कोयता) अवैधरित्या बेकायदेशीररित्या बाळगलेले असताना हरीभाऊ पाटलु उदयानाजवळ, वारजे पुलाखाली पुणे येथे सापळा रचुन शिताफिने ताब्यात घेवुन पुढील कारवाईकरिता वारजे पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, पुणे शहर श्री. पंकज देशमुख, मा. पोलीस उप-आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर श्री. निखील पिंगळे, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे पुणे शहर श्री. राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनिट ३. गुन्हे शाखा श्री. भाऊसाहेब पाटील, सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर ढवळे, सहा. पोलीस निरीक्षक पंढरीनाथ शिंदे, पोलीस अंमलदार अमोल काटकर, किशोर शिंदे, मोहम्मद शेख, तुषार किंद्रे, पुरुषोत्तम गुन्ला यांनी केली आहे.



# तालुका विधी सेवा समिती अंतर्गत धर्माबाद येथे लोकअदालताचे आयोजन

दैनिक युवक आधार
धर्माबाद (प्रतिनिधी) : गिरमाजी सुर्यकार

तालुका विधी सेवा समितीच्या वतीने धर्माबाद येथे लोकअदालताचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतात विविध प्रकरणांचा निपटारा आपसी सामंजस्याने करून अनेकांना न्याय मिळाला. जनतेला सोप्या व जलद मार्गाने न्याय देण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. लोकअदालतात उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा न्यायालयांमुळे वेळ व खर्च वाचून न्याय मिळतो, असे मत व्यक्त केले.

माननीय दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर धर्माबाद श्री संजय कोळेकर साहेब अभिवक्ता संघ धर्माबाद अध्यक्ष अड.चक्रेश बन्नाळीकर,अड. गंगाप्रसाद चोपडे,अड.सुधीर चिंतावार,अड. उदय बिलोलीकर ,अड.विनायकराव पवार,अड. उत्तमराव कारेगावकर,अड.वसंतराव खानापुरकर,अड.रोहीत ईनाणी, अड.दत्तारेड्डी लक्कडवार ,अड.शंकरराव जगदंबे,अड.मनोहर लोकडे,अड.सलीम शेख,पॅनल सदस्य अड.पूजा चौहान,अड.कांचन धनकवाड,कार्यालयीन अधीक्षक आर.एस .कंधारे व एस.ऐन.कौठेकर. लघुलेखक के.डी.पवार व इतर न्यायालयीन कर्मचारी यांच्या प्रयत्नाने राष्ट्रीय लोकअदालत अत्यंत यशस्वीरित्या पार पडले लोकअदालत ही काळची गरज आहे या मुळे पक्षकारांचे वेळ वाचु लागला आणि जलद गतीने न्याय मिळत आहे आहे यात स्टेट बँक ऑफ इंडिया धर्माबाद शाखा व येताळा,बँक ऑफ महाराष्ट्र,इतर बॅंका यांनी सहभाग नोंदवला होती आज 25 प्रकरणे निकाली काढले असुन 37लक्ष रुपयांची वसुली झाली आहे.




# कै.राजेश तेरवणकर सर म्हणजे शांत संयमी शिक्षक जणू अर्जुना माध्यमिक विद्यालय कारवलीचे साने गुरुजीच - दादा दळवी

**दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)** तेरवणकर सर म्हणजे शांत सयंमी व अर्जुना माध्यमिक विद्यालय कारवलीचे साने गुरुजी होते असे भावपूर्ण उद्‌घागार दादा दळवी यांनी काढले ते अर्जुना माध्यमिक विद्यालय कारवली या विद्यालयाचे मुख्याध्यापक कै.राजेश तेरवणकर यांच्या शोक सभेच्या कार्यक्रमात बोलत होते अर्जुना विद्यालय कारवलीचे मुख्याध्यापक कै.राजेश राजाराम तेरवणर यांचे २ सप्टेंबर २०२५ रोजी हृद्यविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मित निधन झाले अर्जुना खोरे विकास मंडळ कारवली या संस्थेच्या वतीने तेरवणकर सरांची शोकसभा बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केली होती या शोकसभेला कारवली परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते संस्थेचे अध्यक्ष ज्ञानदेव दळवी हे अध्यक्ष स्थानी होते कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश ऐनारकर सरचिटणीस डॉ.विश्वास जाधव सहसचिव सुनील जाधव खजिनदार सौ.भारती वरेकर संचालक व माजी अध्यक्ष रामचंद्र वरेकर प्रसाद वरेकर शिवाजी जाधव महेंद्र वरेकर त्याचप्रमाणे पांगरी गावचे सरपंच अमर जाधव पोलीस पाटील सयाजी जाधव विलास नारकर प्रदिप गांधी देसाई गुरुजी या शाळेचे माजी शिक्षक गौतम पांगरीकर ताम्हाणे हायस्कुलचे शिक्षक विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक शहाजी वाठोरे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तसेच अनेक ग्रामस्थ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते यावेळी अनेकांनी तेरवणकर सरांच्या आठवणींना उजाळा दिला काही वक्त्यांना त्यांच्या आठवणीला उजाळा देताना अश्रूंचा बांध फुटलेला पाहायला दिसून आले विद्यार्थ्यांनी सुद्धा सरांच्या जीवनावर विचार व्यक्त करत असताना त्यांचे मराठी शिकवण्याचे कसब विद्यार्थ्यांप्रति असणारे प्रेम आणि ग्रामस्थांमध्ये असणारी त्यांच्याविषयीची आपुलकी ही सर्व वक्त्यांच्या बोलण्यामध्ये दिसून येत होती कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उमेश दळवी यांनी केले.



# ग्रामीण भागात कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने भुमीपुत्र संघटनेची विरुगीरी

पाच कार्यकर्त्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून तब्बल अडीच तास केले आंदोलन

दैनिक युवक आधार
उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी

दिग्रस तालुक्यातील ग्रामीण भागात ग्रामसेवक, तलाठी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी पशुवैद्यकीय कर्मचारी, कृषी कर्मचारी सतत गैरहजर राहत असल्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे या निष्क्रियते विरोधात संतप्त झालेल्या भुमीपुत्र या संघटनेच्या विशाल चव्हाण, अंकुश राठोड, रुपेश जाधव, योगेश राठोड,मागीलाल चव्हाण मोख आणि साखरा येथील पाच कार्यकर्त्यांनी विरुगीरी पद्धतीने पशुवैद्यकीय दवाखान्याजवळील नगरपरिषदेच्या पाण्याच्या टाकीवर चढून तब्बल अडीच तास आंदोलन छेडले होते. दिनांक १३ सप्टेंबरला आरोग्य कर्मचारी,तलाठी, ग्रामसेवक शासनाने नागरीकांच्या सेवेसाठी नेमलेले कर्मचारी स्वताला मालक समजायला लागले. तालुक्याच्या ठिकाणी बसून गाडा हाकत आहेत गावातील नागरिकांना कागदपत्रावर सही कीवा कागदपत्रे काढायचे असेल तर सरळ दिग्रसला यावे लागत आहे या अडचणीचा सामना गोरगरीबांना करावा लागत असुन हे प्रकरण तहसीलदाराना अवगत केल्यानंतर सुद्धा काहीच फरक पडला नाही त्यामुळे भुमीपुत्र संघटनेच्या वतीने शनिवारी नगरपरिषदेच्या पाण्याच्या टाकीवर तब्बल अडीच तास कार्यकर्त्यानी आंदोलन करीत घोषणाबाजी केली 'भारत माता की जय ' 'वंदे मातरम् ' इन्कलाब जिंदाबाद ' घोषणा देत संताप व्यक्त करण्यात आला.या घटनेची माहिती मिळताच महसूल व पोलीस विभागांचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल होऊन.आदोलकाशी चर्चा करून संबंधित कर्मचारी उपस्थित राहण्याचे लिखत आश्वासन देण्यात आले मात्र मागण्या त्वरित मान्य न झाल्यास तिव्र आंदोलन आंदोलन करणार असल्याचे आंदोलकांनी म्हटले.




# जालना येथे बंजारा समाजाच्या विराट सभेला हजारोच्या संख्येनी उपस्थित रहा....कैलास चव्हाण

दैनिक युवक आधार
परतूर- जालना(अशोक ठोके)

परतूर तालुक्यातील बंजारा समाजाच्या युवा-युवती, माता-भगिनीं आणि नागरिकांनी 15 सप्टेंबर 2025 वार सोमवार रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर होण्याऱ्या सकल बंजारा समाजाकडून हैदराबाद गॅझेट नुसार बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा या संदर्भात विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होऊन आपण हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान राष्ट्रीय बंजारा परिषदेचे युवा नेते कैलास चव्हाण यांनी केले आहे.बंजारा माता -भगिनींनी आपल्या पारंपारिक वेशभूषेत, भजनी मंडळी थाळी- नगारा हाथी घेवून बंजारा समाजातील नागरिकांनी मोर्चा मधे सहभागी व्हावे असे आवाहन कैलास चव्हाण यांनी केले आहे.या मोर्चा मधे येणाऱ्या सर्व बंजारा समाजातील नागरिकांनी अतिशय शांततेच्या मार्गाने सरकारने दिलेल्या आदेशाचे आणि कायद्याचे पालन करून इतर समाजाबद्दल अपशब्द किंवा त्यांच्या मनाला लागेल असे उदगार काढू नयेत, कुठल्याही समाजाची बदनामी होईल असे कृत्य करू नये. कुठलाही अनुचित प्रकार घडेल असे



वागू नये व समाजाला गालबोट लागेल असे करू नये, हा मोर्चा अतिशय शांत आणि संयमाने निघाला पाहिजे या मोर्चाला पाहून इतर समाजाच्या लोकांनी असा शांत आणि संयमी मोर्चा या अगोदर कधीच झाला नाही अशी चर्चा केली पाहिजे असे कैलास चव्हाण यांनी आपल्या समाज बांधवांना म्हटले आहे.

राष्ट्रीय बंजारा परिषदे कडून कैलास चव्हाण यांनी या आरक्षणाच्या ऐतिहासिक क्षणाला आपला सहभाग नोंदवा असे आवाहन देखील शेवटी त्यांनी केले आहे.

# "चेंढरे बायपास अतिक्रमण प्रकरणात ठोस कारवाई न झाल्यास ग्रामस्थ रस्त्यावर – जबाबदार कोण?

दैनिक युवक आधार निलेश फुंडे रेवदंडा "ग्रामस्थांचा थेट सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कोकण आयुक्त हस्तक्षेप करणार की नाही?"चेंढरे बायपास रोडवरील अनधिकृत बांधकामावर प्रशासनाची डोळेझाक, ग्रामस्थांचा संताप उफाळला; मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व कोकण आयुक्तांकडे हस्तक्षेपाची मागणी होत आहे अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या बायपास रोडवर राजरोसपणे अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम सुरू असून प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. जिल्हाधिकारी, ग्रामपंचायत, बांधकाम विभाग या सर्वांना लेखी तक्रारी देऊनही कोणतीही कारवाई केली नाही. परिणामी ग्रामस्थांचा आक्रोश उफाळून आला असून, सोमवार १५ सप्टेंबर रोजी ग्रामस्थ जिल्हाधिकारी यांची भेट घेणार आहेत.प्रशासनाची उदासीनता ग्रामस्थ आक्रमक,ग्रामस्थांनी थेट आरोप केला आहे की, प्रशासनाचे सर्व यंत्रणाच 'मूक प्रेक्षक' बनल्या आहेत. कोणत्याही प्रकारचा दाखला, नकाशा अथवा परवानगी न घेता खुलेआम बांधकाम सुरू असूनही ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामविकास अधिकारी कोणतीही चौकशी करत नाहीत. ग्रामपंचायत फक्त नावापुरती, कारवाई मात्र शून्य असे नागरिक म्हणत आहेत.अतिक्रमण विरोधी विभागाची निष्क्रियता,तालुक्यात अतिक्रमण विरोधी अधिकारी व विभाग अस्तित्वात असूनही चेंढरे बायपास रोडवर ही यंत्रणा केवळ कागदावर असल्याचे उघड झाले आहे. या सार्वजनिक रस्त्याचे महत्त्व लक्षात घेता अनधिकृत बांधकामामुळे वाहतुकीस अडथळा, अपघाताचा धोका आणि सार्वजनिक सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत आहेत, असा इशारा जाणकारांनी दिला आहे.

आंदोलनाशिवाय प्रशासन हलत नाही .ग्रामस्थांचा आरोप आहे की, आंदोलनाशिवाय प्रशासन दखल घेत नाही. नागरिकांनी संघटितपणे रस्त्यावर



उतरल्याशिवाय अधिकारी जागेवर येत नाहीत. म्हणूनच यापुढे ठोस कारवाई न झाल्यास ग्रामस्थ मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत.ग्रामस्थांच्या ठाम मागण्या त्वरित अतिक्रमणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी.सदर बांधकाम कोणाच्या परवानगीने सुरू आहे, याचा तपशील जाहीर करावा.ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून जबाब द्यावा.अतिक्रमण विरोधी विभाग सक्रिय करून तातडीने कारवाई करावी. सार्वजनिक रस्त्यांची जागा वाचवून सुरक्षित वाहतुकीसाठी ठोस उपाययोजना कराव्यात."मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे मंत्र्यांकडे धाव" ग्रामस्थांनी ठामपणे सांगितले की, प्रशासनाची ही ढिसाळ व निष्क्रिय भूमिका शासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्याचे मुख्य सचिव, केंद्रीय पंचायत सचिव व कोकण आयुक्त यांनी हस्तक्षेप करून कायदेशीर चौकशी करावी. अन्यथा ग्रामस्थांना रस्त्यावर उतरून कठोर आंदोलन करावे लागेल आणि त्याची पूर्ण जबाबदारी शासनावर राहील

# कालिकादेवी विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा

दैनिक युवक आधार
शिरूर कासार (प्रतिनिधी) येथील कालिकादेवी विद्यालयात स्वयंशासन दिन तथा स्कूल डे साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने पर्यवेक्षक जनार्दन काळे यांच्या हस्ते, महात्मा ज्योतिराव फुले, माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व लोकनेत्या स्व. केशरबाई (काकू) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.तसेच स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक चि.अनिकेत गाडेकर, उपमुख्याध्यापक,चि.श्रेयश केदार,पर्यवेक्षक कु.मधुरा नेटके यांनी पण महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने प्राचार्य केशव भांगे साहेब यांचे स्वागत करण्यात आले.स्वयंशासन दिना निमित्ताने विद्यार्थ्यांनी दिलेल्या जबाबदाऱ्या अतिशय काळजीपूर्वक, नियमाप्रमाणे व शिस्तबद्ध पार पाडल्या. काही विद्यार्थी-शिक्षकांनी इंग्रजी,गणित, विज्ञान,भाषाविषय आणि सामाजिक शास्त्रे यांचा अभ्यास करूनच अध्यापन केले. या अध्यापनातूनच अभ्यासक्रमाचे व संस्काराचे धडे दिले.याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेबांनी, स्वयंशासन दिनाच्या अर्थात 'स्कूल डे'च्या निमित्ताने उपस्थितांना व विद्यार्थ्यांना भावी जीवनात योग्य दिशा मिळावी,सभाधीटपणा यावा शैक्षणिक विचार कौशल्य मांडता यावे,त्या अनुषंगाने अतिशय दिशादर्शक,सखोल आणि अभ्यासपूर्ण




मार्गदर्शन केले. शिक्षक- विद्यार्थी चि.शोएब आतार, कु. प्रगती केदार, कु.भक्ती नागरगोजे,कु. आकांक्षा बडे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच चि.तेजस केदार, कु. वैष्णवी थोरात,कु. भक्ती नागरगोजे इत्यादी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन 'स्वयंशासन दिन' उत्साहात साजरा केला. यावेळी विद्यालयातील कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालेगाव येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

शिवसेनेच्या(शिंदे गट)नेत्या,आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या आदेशानुसार शिवसेना जिल्हाप्रमुख महादेव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची आज 12 सप्टेंबर 2025 रोजी मालेगाव येथे बैठक घेण्यात आली तर या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली आहे. स्थानिक विश्रामगृह मालेगाव येथे आयोजित ही बैठक नवनिर्वाचित मालेगाव तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे यांच्या नेतृत्वात घेण्यात आली या बैठकीत होऊ घातलेल्या जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगरपंचायतच्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच पक्ष संघटने बाबत गाव तिथे शाखा स्थापनेबद्दल चर्चा करून सक्रिय कार्यकर्त्यांची पदाधिकारी म्हणून निवड करण्याची ठरली असून शासकीय समितीवर नावे पाठवण्यात संदर्भात चर्चा करण्यात आली आहे,तसेच महत्त्वाचे म्हणजे 16 सप्टेंबर ते 20 सप्टेंबर दरम्यान मालेगाव येथे चार दिवस तालुक्यातील गोरगरीब,शेतकऱ्यांना नागरिकांना,चार्जिंग फवारणी पंप आणि वाटर फिल्टरचा वाटप अल्प दरात करण्यात येणार असल्याची ठरले या प्रसंगी जिल्हाप्रमुख महादेव ठाकरे,उपजिल्हा प्रमुख मंगेश महाराज घुगे,तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास युवा सेना उपजिल्हाप्रमुख अमोल देशमाने,शिवसेना मालेगाव तालुका उप शहरप्रमुख पवन इरतकर,समन्वयक विलासराव जाधव,ओबीसी सेलचे शिवसेना तालुकाप्रमुख गजानन केंद्र,मालेगाव तालुका वैद्यकीय कक्ष प्रमुख राजेश कव्हर,अभिषेक मुंदडा,अभी घुगे,माणिकराव गालट,अनिल जाधव,विवेक गवळी,कैलास राऊत,शंकर वाझुळकर,मोहन लहाने,गोपाल मुठाळ,रामदास कुटे,सागर मगर,रामदास काटेकर,सारसकर,शुभम बळी, योगेश काटेकर,ब्राह्मणवाडा येथील नागरिक तसेच तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवसेनेचे (शिंदे गट)युवा तरुण तडफदार तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे यांच्या नेतृत्वात शिवसेना पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची मालेगाव येथे बैठक घेण्यात आली आहे..



धर्मवीर संभाजी महाराज यांच्या शिल्पास ऐतिहासिक मानवन्दना ( दैनिक युवक आधार- शिवाजी वाघमारे चिखली )

# महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे मुंबईत आगमन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पुष्पगुच्छ देऊन स्वागत

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे पत्नी दर्शना देवी यांच्या समवेत आज मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील राज्यपाल श्री. देवव्रत यांचे स्वागत केले. कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, रेल्वे पोलीस महासंचालक प्रशांत बुरुडे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आँचल गोयल तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल देवव्रत यांना मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे रेल्वे पोलीस विभागामार्फत मानवंदना देण्यात आली.


नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत हे १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पदाची सूत्रे स्वीकारून त्यांचा शपथविधी समारंभ होणार आहे.



## सिन्नर तालुक्यात नरभक्षक बिबट्याचा धुमाकूळ...
### एका आठवड्यातच दोन लहान बालकांना केले ठार...
### सिन्नरच्या देवपूर निमगाव येथील घटना...

**दैनिक युवक आधार निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

सिन्नर :-सिन्नर तालुक्यात नर भक्षक बिबट्याचा धुमाकूळ सुरू असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दिनांक 13 सायंकाळच्या सुमारास देवपूर निमगाव येथे केवळ दीड वर्षांचा गोलू युवराज शिंगाडे हा चिमूरडा घराजवळ असलेल्या कांदा चाळीजवळ खेळत असताना बिबट्याने त्याला जबड्यात पकडून मकाच्या शेतात खेचत नेऊन ठार केले याआधी, अवघ्या आठवडाभरापूर्वी पंचाळे गावात सारंग गणेश थोरात हा दहा वर्षांचा बालक बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडला होता. सलग दोन घटना घडल्यानं सिन्नर तालुक्यात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याच चित्र स्पष्ट झाले असून एकाच आठवड्यात दोन निरागस बालकांचे प्राण गेल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचं वातावरण आहे. तसेच ग्रामस्थ संतप्त देखील झाले आहेत वनविभागाने तातडीने पिंजरे लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे



# भाजपा मच्छीमार सेल तालुका अध्यक्षपदी निरज मन्ने यांची नियुक्ती

दैनिक युवक आधार – घाटंजी तालुका प्रतिनिधि . महेश पेन्दोर

घाटंजी : भारतीय जनता पक्षाच्या मच्छीमार सेल, घाटंजी तालुका अध्यक्ष पदी घाटंजी शहरातील निरज भुमाजी मन्ने यांची नियुक्ती करण्यात आली.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत, पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी पूर्ण सक्षमतेने काम करू, असा विश्वास निरज मन्ने यांनी नियुक्तीनंतर व्यक्त केला. आपल्या नियुक्तीबद्दल त्यांनी आपल्या मतदारसंघाचे आमदार प्रा. राजुभाऊ तोडसाम, भाजपा जिल्हा नेते मदन येरावार, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, जिल्हाध्यक्ष प्रफुल चव्हाण, राहुल हरसुळे, सेल जिल्हाध्यक्ष प्रदीप भानारकर, यांचे आभार मानले. 'पक्षाच्या विचारधारेनुसार काम करत, समाजातील सर्व घटकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव तत्पर राहील,' असे ते म्हणाले. निरज मन्ने यांच्या निवडीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून त्यांच्या नेतृत्वाखाली मच्छीमार सेल घाटंजी अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहे.



# साडेसहाशे प्रकरणांत तडजोड, निफाड लोकन्यायालयातून 10 कोटींची वसुली

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी



निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय लोकन्यायालयात तब्बल 648 प्रकरणांत यशस्वी तडजोड साधण्यात आली. या तडजोडींमधून 10 कोटी 43 लाख 80 हजार 317 रुपयांची वसुली झाल्याने न्यायालयीन व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला आहे. राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन जिल्हा व सत्र न्यायाधीश-2 के. आर. जोगळेकर यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण करून करण्यात आले. या वेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. काळे, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश ए. आर. गुन्नाल, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एन. एन. जोशी तसेच प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. पी. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली समितीद्वारे कामकाज पार पडले. या लोकन्यायालयात एकूण 8215 प्रकरणे नेमण्यात आली होती. त्यापैकी वादपूर्व 6656 प्रकरणांतून 456 प्रकरणांत यशस्वी तडजोड होऊन 1 कोटी 48 लाख 81 हजार 229 रुपये वसूल झाले. तर न्यायप्रविष्ट 1559 प्रकरणांपैकी 192 प्रकरणांत तडजोड होऊन तब्बल 8 कोटी 94 लाख 99 हजार 87 रुपये वसूल झाले. याप्रमाणे वादपूर्व व न्यायप्रविष्ट मिळून एकूण 648 प्रकरणांत तडजोड होऊन 10 कोटी 43 लाख 80 हजार 317 रुपयांची वसुली झाली आहे. लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी निफाड वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. प्रविण ठाकरे, उपाध्यक्ष ॲड. रामनाथ सानप, सचिव ॲड. रामनाथ शिंदे, खजिनदार ॲड. केशव शिंदे, सदस्य ॲड. सुनील शेजवळ यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रभारी अधिक्षक अभिजित कुलकर्णी, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचे अधिक्षक उमाकांत कोळी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाच्या अधिक्षक निता कवडे, संगणक विभाग प्रमुख स्वप्निल भालेराव, अमित अहिरे, अक्षय जाधव तसेच न्यायालयीन कर्मचारी, लिपिक व लेखनिक यांनी विशेष परिश्रम घेतले. समिती सदस्य म्हणून ॲड. प्रभाकर केदार, ॲड. अफरोज शेख, ॲड. शरद वाघ, ॲड. सुवर्णा चव्हाण व ॲड. भावना चोरडिया यांनी कामकाज पाहिले. राष्ट्रीय लोकन्यायालयामुळे निफाड न्यायालयातील मोठ्या प्रमाणावरील प्रलंबित प्रकरणे सोडवून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## दारव्हा तालुक्यातील सर्व शासकीय कर्मचारी आपल्या कर्तव्यावर जात नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप.

दैनिक युवक आधार.
किशोर कांबळे तालुका प्रतिनिधी दारव्हा.

दारव्हा तालुक्यातील शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांचा हम करो सा कायदा. कर्तव्यावर असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी अवलंबला आहे. मात्र आपल्या शासकीय कर्तव्याची शासन कायदा एक्टनुसार अपॉइंटमेंट अर्थात रुजू होते वेळेस कर्तव्याचे प्रतिज्ञापत्र देते वेळेस मी कर्तव्याची पूर्णपणे जबाबदारी घेऊन माझे मी कर्तव्य पूर्णपणे व्यवस्थितपणे नागरिकाच्या समस्या व अधिकाऱ्यांच्या नियमाची पूर्णपणे पालन करीन असे प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यानंतरही. परंतु कर्मचारी मुख्यालय राहण्याचे बंधनकारक असतानाही. मुख्यालय राहत तर नाहीच. परंतु ड्युटीच्या कर्तव्यावर दांडी मारण्याचे काम शंभर टक्के पणे करीत आहे.असे नागरिकांमध् संताप व्यक्त केल्या जात आहे. ग्रामसेवक गावात येतच नाही. कोणत्याही लहानशा कामासाठी पंचायत समिती दारव्हा येथील जाऊन त्यांची स्वाक्षरी घ्यावा लागतो. तलाठी तर सोडूनच द्या. आपल्या घरी बसूनच सर्वेक्षण करण्याचे काम काम करतात कोणत्याच प्रकारची पाहणी किंवा स्वतः जाऊन सर्वे करणे हे त्यांची कर्तव्य असतानाही हलगर्जी पूर्ण करतात त्यामुळे नागरिकांची अपुरे काम राहत असल्यामुळे नागरिकांची मानसिक तणाव तथा आर्थिक मृदंड सहन करावा लागतो. त्या मागेच कृषी सहारांचीही अशीच स्थिती पाहण्यास मिळत आहे. एखाद्या शेतात पाणी शिरले तर शेतकऱ्याची शेती जर खरडून गेली तर. कृषी सहायक गावात हजार नसून थातूरमातूर घरी बसल्या सर्व करून अंशता पूर्णतः मध्ये टाकण्याकरिता शेतकऱ्यापासून आर्थिक देवाणघेवांची चर्चा करतात. आरोग्य विभागातील कर्मचारी आरोग्य केंद्रावर जाऊन फेरफटका मारतात खरे तर गावात फिरण्याची त्यांची ड्युटी असल्यानंतरही आरोग्य कर्मचारी लगेच आपल्या घरी निघतात अशी नागरिकांची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे. शिक्षकांचा विषय सोडूनच द्या. एखाद्या शाळेवर चार शिक्षक असले तर. दोन शिक्षक शाळा संभाळतात तर दोन आपल्या घरचे काम सांभाळतात.. तर दुसऱ्या दिवशी. हे दोन शिक्षक. आपले घर सांभाळतात. तर दोन शाळा सांभाळतात. अनेक वर्षापासून यांचं नाट्य चालू असून शासनाची दिशाभूल करीत आहे. तरीसुद्धा नागरिक सर्व त्यांचे नाट्य सहन करत असून. परंतु कामाच्या वेळेस कामा येणार या लालची पोटी नागरिक त्यांचा विरोध करण्यास टाळाटाळ करीत आहे.परंतु याचा पुरेपूर फायदा कर्मचारी वर्ग व शिक्षक घेत आहे. आता हे सर्व यांचे पवित्रेमय झाल्या असून. नागरिक संतापलेले दिसत असून उग्ररूप धारण करण्याच्या मानसिकतेस दिसत आहे.

# पदाधिकारी यांचा सन्मान सोहळा व शिक्षकांचा निरोप समारंभ सोहळा जि.प.उ.प्रा.सेमी इंग्रजी माध्यम डिजिटल शाळा वनोजा येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

राळेगावः-तालुक्यातील वनोजा येथे जि.प.उ.प्राथमिक शाळा येथील पदाधिकारी व शिक्षकांचा निरोप समारंभ संपन्न झाला,यात अध्यक्ष मा.श्री.श्रीकांतजी वटाणे(पोलीस पाटील),प्रमुख पाहुणे मा.श्री.राजुभाऊ बेताल (फिल्ड को ऑर्डीनेटर) राळेगांव, तसेच श्री.सिद्धार्थजी नगराळे प्रतिष्ठित नागरिक, व मा.श्री.भास्करराव काचोळे (तंटामुक्ती अध्यक्ष) ,श्री.जितेन्द्र खोडे (पत्रकार दैनिक यूवक आधार जिल्हा प्रतिनिधी यवतमाळ) यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पन करण्यात आले.

त्यानंतर मंचावर उपस्थितांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ग्रामस्थ व शाळेच्या वतीने ग्रामपंचायत पदाधिकारी व शाळा व्यवस्थापन समिती एकूण एकविस पदाधिकारी यांना सस्नेह भेट देऊन शाळेला सहकार्य केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.त्यानंतर आदरणिय श्री.सुनिल मेश्राम सर यांना सस्नेह भेट देऊन सन्मानित करून निरोप देण्यात आला .त्यानंतर ग्रामस्थांनी आदरणिय सौ.सविता व.उईके मॅडम व त्यांचे पती श्री.वसंतराव उईके यांना ग्रामस्थानकडून ज्यूपिटर गाडी निरोपसमारंभ समयी भेट देण्यात आली व शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.ही भेट चांगल्या कामाची पावती आहे अशाप्रकारे सौ.उईके मॅडम यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी भारावल्या अंतकरणाने मनोगत व्यक्त केले सोहम रमेश टेकाम या विद्यार्थ्याच्या मनोगतातून अक्षरशः सर्व विद्यार्थी रडले.त्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.मोरेश्वरजी वटाणे यांनी मनोगत व्यक्त केले त्यानंतर श्री.प्रभाकरजी दांडेकर माजी सरपंच व उपसरपंच ,श्री. जितेन्द्र खोडे दैनिक यूवक आधार यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी ,श्री.भास्कर काचोळे तंटामुक्ती अध्यक्ष , श्री.सिध्दार्थजी नगराळे प्रतिष्ठित नागरिक,श्री.मारोती सोनटक्के शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी मनोगतातून मॅडमच्या चांगल्या कामाचा व अध्यापनाचा पाढा वाचला व ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी यांचे डोळे पानावल्या गेले. एका शिक्षिकेने एवढा जिव्हाळा समाजात पेरला ते सोपे नाही हे या कार्यक्रमातून निदर्शनास आले.

गावातील चार भजनमंडळ यांनी सुद्धा सस्नेह भेट दिली.

यानंतर कु.साची आकाश उगेमुगे,कु.ज्ञानेश्वरी सतिश टेकाम,कु.गुंजन अंकूश भासपाले या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले.यानंतर श्री. मेश्राम सर यांनी मनोगत व्यक्त केले.

ओम शिवशक्ती भजन मंडळ यांच्याकडून उईके मॅडमला सस्नेह भेटवस्तू देण्यात आली.त्यानंतर उईके मॅडम यांच्या मनोगतातून शाळेविषयीच्या भावना व्यक्त केल्या.लोकसहभाग मध्ये ग्रामपंचायत समिती व शिक्षण समिती व ग्रामस्थ यांनी शाळेला रोखरूपात सहकार्य केले तसेच तालुकास्तरीय खेळात सुद्धा प्रत्येकी दोन हजार रू वर्गणी काढून सहकार्य केले या सहकार्याच गणित कसं मांडावं असा भाव त्यांनी व्यक्त केला ""निरोप नव्हे हा ओलावा माणुसकीचा ""!! कसे विसरू मी क्षण हा सौख्याचा !! ज्यूपिटर गाडी देऊन सन्मानित केले त्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे व सर्व पदाधिकारी वनोजा यांचे आभार मानून सदैव आपल्या ऋणात राहील असा भावपूर्ण निरोप घेतला व सर्व चिमुकल्यांना पेन व वही भेट देण्यात आली.

यानंतर अध्यक्षीय भाषण श्री.श्रीकांतजी वटाणे यांनी त्यांच्या मनोगतात दोन्ही शिक्षक आपल्या शाळेकरिता चांगले होते त्यांनी नवीन शाळेतसुद्धा चांगले काम करावे अशा शुभेच्छा दिल्या.कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता,ललितातातताई मो. वटाणे सखी सावित्री सदस्य ,शितल सं.चिंचोणे समुपदेशक ,सरपंच मालुताई दि. कोटनाके,रेखाताई गजानन बुरले उपाध्यक्ष, चंदाताई म.पोटूरकर ग्राम पंचायत सदस्य व माजी सरपंच, शुभांगीताई चं.उगेमुगे माता पालक संघ सदस्य,स्वातीताई स.टेकाम सदस्य यांनी श्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी केला.

सातशे लोकांनी उत्कृष्ट स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.स्वादिष्ट बुंदीचे लाडू बनविण्याकरिता रामकृष्णहरी महिला भजन मंडळाचे शाळेला सहकार्य लाभले.स्वादिष्ट भोजन बनविण्याकरिता जय बजरंगबली महिला भजन मंडळ,नव दुर्गामाता भजन मंडळ यांचे सहकार्य शाळेला लाभले.श्री.भोयर सर यांनी कार्यक्रमाप्रती भावना व्यक्त करुन शाळेच्या वतीने सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

